282 289

947

परिपत्रक

क्रमांक कान/स्थायी आदेश /क-१/९९,
कार्यालय, जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, म. राज्य, पुणे
दिनांक १७ /८/१९९९

17 AUG 1999

विषय: जमीन एकत्रीकरण योजना
स्थायी आदेश संचिका अद्यावत ठेवणेबाबत.

या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, बहुतांश अधिक्षक भूमि अभिलेख / तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांचे कार्यालयात जमीन एकत्रीकरण योजनेसंबंधी तसेच त्यावरील तक्रार अर्ज संबंधी स्थायी आदेश संचिका संधारण केलेली नाही अगर संधारण केली आहे तर ती अद्यावत नाही ही बाब योग्य नाही.

२. सबब याद्वारे सूचना देणेत येत आहे की, प्रत्येक अधिक्षक भूमि अभिलेख/ तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालयात जमीन एकत्रीकरण विषयाशी संबंधित स्थायी आदेश संचिका संधारण करुन ती अद्यावत आणावी व त्या बाबतचे प्रमाणपत्र दिनांक ३०/९/९९ पावेतो उपसंचालक भूमि अभिलेख यांचेकडे सादर करावे. उपसंचालक यांनी त्यांचे विभागातील सर्व कार्यालयात स्थायी आदेश संचिका अद्यावत असल्याबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास दिनांक १५/१०/९९ पावेतो पाठवावे.

३. वरील सूचनेची काटेकोरपणे अंमल बजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आल्यास कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरुन त्यांचेविरुध्द कार्यवाही करणेत येईल.

[ अमिताभ चंद्र ]
जमाबंदी आयुक्त.

१] तालुका निरीक्षक भूमि अभिलेख [ सर्व]
२] अधिक्षक भूमि अभिलेख [ सर्व] सातारा
३] उपसंचालक भूमि अभिलेख [सर्व]
४] कार्यालय अधिक्षक [एकत्रीकरण]
२. त्यांनी अधिनस्थ कार्यालय निरीक्षण वेळी ही बाब प्रकर्षाने तपासावी.

अधीक्षक, भूमि अभिलेख

४८७

क्रमांक कान/स्थायी आदेश /क-१/९९,
कार्यालय, जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख, म. राज्य, पुणे
दिनांक १७ /८/१९९९